महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.११/ ११३७८
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - ६९४२५१४१
दिनांक : **१५.०४.२०२४**

# परिपत्रक

**विषय :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या सीमेलगतच्या भागातील मतदारांना मतदानाच्या तारखेस मतदान करण्याकरीता एक दिवसाची भरपगारी सुट्टी मंजूर करणेबाबत.

**संदर्भ :** १.प्रशासकीय परिपत्रक क्र.६७० दि.०३.०४.२०२४
२.महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्र.- संकीर्ण २०२४/प्र.क्र.६७/कामगार-९ दि. ०५.०४.२०२४

*****

भारत निवडणूक आयोगाने दि. १६ मार्च २०२४ च्या प्रसिध्दिपत्रकाव्दारे भारतातील विविध राज्यांमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. सदर निवडणुकीचे मतदान महाराष्ट्र राज्यात दि.१९ एप्रिल,२०२४, दि.२६ एप्रिल,२०२४, दि.०७ मे,२०२४, दि.१३ मे,२०२४, व दि.२० मे,२०२४, अशा पाच टप्प्यात होणार आहे. या अनुषंगाने या निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा यासाठी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्र. लोसानि-२०२४/प्र.क्र.२६/उद्योग-६ दि.२२.०३.२०२४ अन्वये लोकसभा मतदारसंघातील मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. याच धर्तीवर महावितरण कंपनीमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनकरिता प्रशासकीय परिपत्रकक्र.६७० दि. ०३.०४.२०२४ नुसार सूचना प्रसृत करण्यात आलेल्या आहेत.

२. उद्योग, ऊर्जा , कामगार व खनिकर्म विभाग, महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्र.- संकीर्ण २०२४/प्र.क्र.६७/कामगार-९ दि. ०५.०४.२०२४ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या सीमेलगतच्या जिल्ह्यामध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क योग्य रीतीने बजावता यावा याकरिता परिशिष्ट-२ मध्ये सीमेलगतच्या राज्यांची नावे व लोकसभा मतदारसंघ यांचा नव्याने समावेश करुन अतिरिक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३. या अनुषंगाने सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीनुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, संदर्भिय क्र.२ येथे नमूद शासन परिपत्रकाच्या धर्तीवर कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांना लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा याकरिता शासन निर्णय दिनांक ०५.०४.२०२४ मधील परिशिष्ट क्र.२ नुसार लोकसभा मतदारसंघनिहाय मतदारांना राज्याच्या सीमेलगतच्या भागातील इतर राज्यांच्या मतदानाच्या तारखेस मतदानाकरिता एक दिवसाची भरपगारी सुट्टी देणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या E-library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत- वरीलप्रमाणे

(भूषण कुलकर्णी)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/(मासं)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(देयके व वसूली)/(वितरण)/(वित्त व लेखा) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/
मुख्य विधी अधिकारी/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

५) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुक-२०२४ करिता लोकसभा मतदारसंघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक-संकीर्ण २०२४/प्र.क्र.६७/कामगार-९**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०५ एप्रिल, २०२४

संदर्भ:- १. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.जीईएन-२०२४/प्र.क्र.३४६/२४/३३, दि.२३ मार्च, २०२४.
२. भारत निवडणूक आयोगाचे यांचे क्र.ECI/PN/२३/२०२४, दि.१६ मार्च, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.
३. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४६४/L&O/२०२४/EPS, दि.२१ मार्च, २०२४.

**शासन परिपत्रक :-**

आपल्या देशाने लोकशाही पध्दती स्विकारली असून १८ वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांनी प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदान करणे अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेता लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ च्या परिच्छेद १३५(बी) नुसार मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणुकांमध्ये असे दिसून आले आहे की, काही संस्था/आस्थापना इ. त्यांच्या कामगारांना भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नाहीत. त्यामुळे अनेक मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित रहावे लागते, जे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.

२. भारत निवडणूक आयोगाने दि.१६ मार्च, २०२४ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. सदर निवडणूकीचे मतदान राज्यात **परिशिष्ट-१** मध्ये नमूद केल्याप्रमाणे दि.१९ एप्रिल, २०२४, दि.२६ एप्रिल, २०२४, दि.०७ मे, २०२४, दि.१३ मे, २०२४ व दि.२० मे, २०२४ अशा पाच टप्प्यात होणार आहे. तसेच महाराष्ट्र राज्याच्या सीमेलगतच्या जिल्ह्यामध्ये **परिशिष्ट-२** मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्य रीतीने बजावता यावा यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

I) राज्यात तसेच महाराष्ट्र राज्याच्या सीमेलगतच्या भागातील निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना, मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी.

II) सदर सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहिल (उदा. खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.)

III) अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत त्यांनी संबंधित महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहिल.

IV) वर नमूद केल्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी / व्यवस्थापनाने वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित आस्थापनांविरुध्द कारवाई करण्यात येईल.

४. सदर परिपत्रक भारत निवडणूक आयोगाचे यांचे क्र.ECI/PN/२३/२०२४, दि. १६ मार्च, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक आणि भारत निवडणूक आयोग यांचे क्र.४६४/L&O/२०२४/EPS, दि. २१ मार्च, २०२४ रोजीच्या पत्रास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०४०५१४३४२२९२१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=3389518a88af500ef17fd52858804c56d5b0db93ce68c9638764849614f0c8b3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2024.04.05 14:46:44 +05'30'

**( स्वप्निल कापडणीस )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सोबत-परिशिष्ट-१ व २.**

**प्रत** - उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधित आस्थापनांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

१. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
२. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. कामगार आयुक्त, वांद्रे, मुंबई-५१ (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
४. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, वांद्रे, मुंबई (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
५. संचालक, बाष्पके, वांद्रे, मुंबई, (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
६. आयुक्त, सर्व जिल्हे, महाराष्ट्र राज्य.
७. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई यांना व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
९. कामगार विभागातील सर्व कार्यासने.
१०. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती कामगार-९.

**शासन परिपत्रक क्रमांक-संकीर्ण २०२४/प्र.क्र.६७/कामगार-९, दि.०५ एप्रिल, २०२४ सोबतचे**

**परिशिष्ट-१**

| मतदानाचे टप्पे | मतदानाचा दिनांक | लोकसभा मतदार संघाचे नाव |
|---|---|---|
| पहिला टप्पा | १९ एप्रिल,२०२४ | ९- रामटेक, १०-नागपूर, ११-भंडारा-गोंदिया, १२-गडचिरोली-चिमूर, १३-चंद्रपूर |
| दुसरा टप्पा | २६ एप्रिल, २०२४ | ५-बुलढाणा, ६-अकोला, ७-अमरावती, ८-वर्धा, १४-यवतमाळ-वाशिम, १५-हिंगोली, १६-नांदेड, १७-परभणी |
| तिसरा टप्पा | ७ मे, २०२४ | ३२-रायगड, ३५-बारामती, ४०-उस्मानाबाद, ४१-लातूर, ४२-सोलापूर, ४३-माढा, ४४-सांगली, ४५-सातारा, ४६-रत्नागिरी-सिंधुदूर्ग, ४७-कोल्हापूर, ४८-हातकणंगले |
| चौथा टप्पा | १३ मे, २०२४ | १-नंदुरबार, ३-जळगाव, ४-रावेर, १८-जालना, १९-औरंगाबाद, ३३-मावळ, ३४-पूणे, ३६-शिरूर, ३७-अहमदनगर, ३८-शिर्डी, ३९-बीड |
| पाचवा टप्पा | २० मे, २०२४ | २-धुळे, २०-दिंडोरी, २१-नाशिक, २२-पालघर, २३-भिवंडी, २४-कल्याण, २५-ठाणे, २६-मुंबई उत्तर, २७-मुंबई उत्तर-पश्चिम, २८-मुंबई उत्तर पूर्व, २९-मुंबई उत्तर मध्य, ३०-मुंबई दक्षिण मध्य, ३१-मुंबई दक्षिण |

## परिशिष्ट-२

| सीमालगतच्या राज्याचे नाव | लोकसभा मतदारसंघ | महाराष्ट्र राज्यातील संबंधित जिल्हे | मतदानांचा दिनांक |
|---|---|---|---|
| गुजरात | २१-छोटा उदयपुर, २२-भरुच, २३-बारडोली, २६-वलसाड | नाशिक, पालघर, धुळे, नंदुरबार, | दिनांक ०७ मे, २०२४ तिसरा टप्पा |
| मध्यप्रदेश | १५-बालाघाट, १६-छिंदवाडा | भंडारा, गोंदिया, नागपूर | दिनांक १९ एप्रिल, २०२४-पहिला टप्पा |
| | २९-बैतूल | अमरावती, बुलढाणा | दिनांक २६ एप्रिल, २०२४-दुसरा टप्पा |
| | २४-रतलाम, २७-खारगोर, २८-खंडवा | बुलढाणा, जळगाव, धुळे, नंदुरबार, अमरावती | दिनांक १३ मे, २०२४- चौथा टप्पा |
| छत्तीसगढ | ६-राजनंदगाव, ११-कांकेर | गडचिरोली, गोंदिया | दिनांक २६ एप्रिल, २०२४-दुसरा टप्पा |
| | १०-बस्तर | गडचिरोली | दिनांक १९ एप्रिल, २०२४-पहिला टप्पा |
| तेलंगणा | ४-अदिलाबाद, २-पेडापल्ली, ४-निजामाबाद, ५-जहिराबाद | गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, नांदेड, लातूर | दिनांक १३ मे, २०२४- चौथा टप्पा |
| कर्नाटक | १२-उत्तर कानडा, २-बेळगाव, १-चिकोली, ४-बिजापूर, ५-गुलबर्गा, ७-बिदर | लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, सांगली कोल्हापूर | दिनांक ०७ मे, २०२४- तिसरा टप्पा |
| गोवा | १-उत्तर गोवा | सिंधुदुर्ग | दिनांक ०७ मे, २०२४- तिसरा टप्पा |

*******************